

दीपस्तंभ

प्राचार्य शिवाजीराव भोसले

... ३६ ...

ज्ञानयोगी

डॉ. राधाकृष्णन

विद्येमुळे जीवनास कृतार्थता आणि व्यक्तीस श्रेष्ठता लाभते, असे म्हटले जाते. या प्रमेयाचे प्रत्यक्ष आणि मूर्तिमंत उदाहरण म्हणून डॉ. राधाकृष्णन यांच्या जीवनाकडे पाहता येईल. अखंड वाचन, चिंतन, अध्ययन, अध्यापन, ग्रंथलेखन, परिशीलन, तत्त्वचिंतन आणि विचारमंथन या प्रक्रियांनी संपन्न असे सर्वपल्लींचे जीवन हे एक नवल आहे. प्रस्थानत्रयीवर भाष्य लिहिणाऱ्या 'शंकर-रामानुज-मध्व' या प्राचीन आचार्य परंपरेशी नाते सांगणारे विज्ञानयुगातील एक प्रज्ञावंत म्हणजे डॉ. राधाकृष्णन!

सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म दि. ५ सप्टेंबर १८८८ या दिवशी तिरुपतीजवळ असणाऱ्या तिरुत्तानी नावाच्या तीर्थक्षेत्रात झाला. सर्वपल्ली हे आंध्र प्रदेशातील एक खेडे. राधाकृष्णन यांच्या पूर्वजांचे ते गाव! त्या प्रदेशात असणाऱ्या प्रथेस अनुसरून व्यक्तीच्या नावापूर्वी गावाचे नाव लिहिले जाते. डॉ. राधाकृष्णन सर्वपल्ली झाले या प्रथेमुळे. त्यांचे वडील एका जमीनदाराच्या पदरी लेखनिक म्हणून काम करीत होते. वडिलांचे नाव वीरस्वामी आणि आईचे नाव सीताम्मा होते. त्यांची राहणी साधी व सांपत्तिक स्थिती बेताची होती. मनोरथांचे मनोरे रचणे त्यांच्या आवाक्याबाहेरचे होते. मुलगा तिरुत्तानीच्या प्राथमिक शाळेत गेला. तेथे तो चमकला. त्याने दोन पावले पुढे जावे असे वडिलांना वाटले. तिरुपती येथील ल्यूथर मिशन स्कूलमध्ये त्याचे नाव घातले. तेथेही तो झळकला. घराला विद्येचा मोह पडला. वेलोर येथील व्हूरिस कॉलेज आणि मद्रासचे ख्रिश्चन कॉलेज या महाविद्यालयांत पुढचे शिक्षण घेण्यासाठी हा विद्यार्थी गेला. सतत बारा वर्षे मिशनरी मंडळींनी चालवलेल्या शिक्षण संस्थांतून हा विद्यार्थी वावरत राहिला. चारित्र्यसंपन्न आणि श्रद्धावंत व्यक्तींनी चालवलेल्या या विद्यालयांचा व महाविद्यालयांचा परिसर भारलेला होता. प्रभूची प्रेरणा आणि कृपा हे संयोजकांचे श्रद्धाबल होते. त्यांच्या शैक्षणिक कार्यास भगवंताचे अधिष्ठान होते. राधाकृष्णन त्या अनंताच्या आधिपत्याखाली आपले जीवन संस्कारित होत होते. बायबल त्यांना आवडत होते, परमेश्वर त्यांना प्रिय होता; पण या

सर्वांचा विरस करणारा एक विचार नकळत त्यांच्या मनावर लादला जात होता. पराभूत भारताची संस्कृती तेजोहीन मानली जात होती. स्वधर्माचा तेजोभंग होत होता. हा तेजोवध राधाकृष्णनांना व्याकूळ करीत होता. हे सर्व घडत असतानाच विवेकानंदांच्या विजयवार्तेने भारतीयांची मने मोहरून आली होती. राष्ट्राचे जीवनचैतन्य पल्लवित झाले होते. राधाकृष्णनांना अभिमानाचे भरते आले होते. त्यांनी निर्धार केला की, हिंदू धर्म आणि संस्कृती यांचा तर्कशुद्ध पद्धतीने अभ्यास करावयाचा. ग्राह्य कोणते, कालबाह्य कोणते, तर्कविसंगत कोणते हे सर्व जाणिवेच्या तराजूत जोखून पाहावयाचे, निरखून-पारखून काही हाती आले, राहिले, पटले व परवडले तर ते जगापुढे ठेवावयाचे. जे काही करावयाचे ते अभ्यासपूर्वक, विचारपूर्वक करावयाचे, असे त्यांनी ठरवले.

या निर्धाराला पायाशुद्ध अभ्यासाची बैठक लाभावी म्हणून सर्वपल्लींनी तत्त्वज्ञान हा विषय विशेष व्यासंगासाठी निवडला. सर्व परीक्षांत प्रथम श्रेणीचे यश त्यांचा पाठपुरावा करीत असे. एम.ए. साठी एक प्रबंध लिहावयाचा होता. राधाकृष्णन यांनी लिहिलेल्या प्रबंधाचा विषय होता 'Ethics of the Vedanta' 'वेदान्तातील नीतिशास्त्र' हाच विषय निवडण्यामागे एक हेतू होता. भारतीय तत्त्वज्ञानाविरुद्ध आक्षेप घेणाऱ्यांच्या विचारांचा परामर्श घेणे आणि प्रतिवाद करणे हा सर्वपल्लींचा मनोदय होता. काही पाश्चिमात्यांचे म्हणणे असे होते, ''जर केवळ ब्रह्मच सत्य असेल तर स्वातंत्र्य उरतेच कोठे? आणि जग ही माया असेल तर युक्त आणि अयुक्त हा भेद राहतोच कोठे? नीती आणि अनीती असा फरकच राहत नाही. तात्पर्य, वेदान्तात नीतिविचार नाही.'' सर्वपल्लींना विरोधकांच्या या भूमिकेचे खंडन करावयाचे होते. व्यावहारिक सत्तेच्या पातळीवरचा संदर्भसापेक्ष विचार हा नित्य जीवनात गृहीत धरलेला आहे, हे आक्षेपकांच्या ध्यानी आणून देणे अगत्याचे होते. या प्रबंधामुळे हा हेतू सफल झाला. डॉ. ए.जी. हॉग या नावाचे आयरिश मिशनरी या प्रबंधामुळे नाराज होतील, अशी आशंका सर्वपल्लींच्या मनात डोकावत होती; पण डॉ. हॉग प्रसन्न झाले. आपल्या या विद्यार्थ्याचा प्रबंध पुस्तकरूपाने प्रसिद्ध करावा, असा त्यांनी अभिप्राय दिला. सर्वपल्लींचा तो पहिला ग्रंथ जेव्हा प्रसिद्ध झाला, तेव्हा ते केवळ वीस वर्षांचे होते.

१९०९ मध्ये सर्वपल्लींची नियुक्ती मद्रासच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये तत्त्वज्ञानाचे सह-प्राध्यापक म्हणून झाली. त्यांच्यासारख्या बुद्धिमान विद्यार्थ्याने ऑक्सफर्ड विद्यापीठात जाऊन अधिक अध्ययन करावे, असा काही मित्रांचा आग्रह होता;



परंतु सर्वपल्लींना स्वत:च्या व कुटुंबाच्या निर्वाहासाठी नोकरी करणे निकडीचे होते. विवाहसमयी ते सोळा वर्षांचे होते. त्यांच्या सौभाग्यवती शिवकमुअम्मा दहा वर्षांच्या होत्या. वडील निवर्तले होते. गरिबीव्यतिरिक्त वडिलार्जित मालमत्ता नव्हती. देवाला नैवेद्य आणि भक्ताला भोजन मिळावे यासाठी गाठीशी धन असावे लागते, हा नियतीचा निष्ठुर स्वभाव डॉक्टरांना माहीत होता. त्यांनी जाणीवपूर्वक आपल्या अपेक्षांना संक्षेप दिला. व्यासंगाची वाट न सोडता निर्वाहाची धडपड केली. सुरुवातीच्या काळात हुद्दा आणि वेतनश्रेणी या दोन्ही बाबतींत त्यांची उपेक्षा झाली. सरकारी नोकरीतील जाचक निर्बंधाविरुद्ध राधाकृष्णन निग्रही नेत्याच्या अट्टहासाने झगडत राहिले. हा लढा देत असताना पात्रतेच्या निकषावर आपण उणे पडणार नाही, याबद्दलही ते दक्ष राहिले. संस्कृत भाषेचा अधिक अभ्यास करून प्रस्थानत्रयी व समग्र भाष्यग्रंथ त्यांनी अभ्यासले. उपलब्ध दर्शनग्रंथांचा धांडोळा घेतला. पश्चिमेकडे उदयास आलेले तत्त्वज्ञानातील संप्रदाय त्यांनी अभ्यासले. प्लेटो, प्लॉटनीस, कांट, ब्रॅडले, बर्गसाँ यांचे ग्रंथ अक्षर व स्वल्पविराम यांसह वाचले. इंग्लिश साहित्यातील विचारप्रवाह जाणून घेतले. शेक्सपीअर, वर्डस्वर्थ, मॅथ्यू ॲर्नाल्ड, कोलरिज, ब्राऊनिंग,

वॉल्ट व्हिटमन या साहित्यश्रेष्ठींच्या लेखनशैलीचा आस्वाद घेतला. गटे, डान्टे, होमर प्रभृतींच्या महाकाव्यसृष्टीत विहार केला. या अखंड व्यासंगाबरोबरच इंग्लिश शब्दकला आत्मसात केली. वाग्देवतेचा वरदहस्त लाभल्यामुळे आणि जिव्हाग्रावर नानाविध सिद्धान्त नांदत असल्यामुळे सर्वपल्लींच्या विवेचनशैलीस एक प्रकारचे लावण्य प्राप्त झाले. वर्गात रमणारी त्यांची रसवंती काही इंग्लिश नियतकालिकांतून सहस्रधारांनी प्रकट होऊ लागली.

या लेखनामुळे सर्वपल्लींना एक आंतरराष्ट्रीय वाचकवर्ग लाभला. 'The Quest', 'Journal of Philosophy',' International Journal of Ethics' ही प्रतिष्ठित इंग्रजी नियतकालिके त्यांच्या लेखांची प्रतीक्षा करीत. सर्वपल्लींचे लेखनलाघव पाहून अनेक प्रकाशनसंस्थांना त्यांचा वेध लागला. लवकरच 'The Philosophy of Rabindranath Tagore' हा डॉ. राधाकृष्णन यांचा दुसरा ग्रंथ प्रसिद्धीस आला. 'गीतांजली' आणि 'साधना' या टागोरांच्या ग्रंथांनी प्रभावित झालेल्या डॉक्टरांनी रवीन्द्रनाथांच्या प्रतिभाविलासामागचे परतत्त्व शोधण्याचा प्रयत्न केला. हा प्रयत्न टागोरांना अतिशय आवडला. यापाठोपाठ विज्ञानयुगातील विचारधारांवर पडणारा धर्मचिंतनाचा प्रभाव विशद करणारा 'Region of Religion in Contemporary Philosophy' हा ग्रंथ प्रकाशित झाला. थोड्याच दिवसांत भारतीय तत्त्वज्ञानातील सर्व दर्शनांचा आणि विचारधारांचा परिचय घडविणारा, दोन खंडांत विस्तारलेला 'Indian Philosophy' या नावाचा ग्रंथराज अवतीर्ण झाला. (इ.स. १९२३).

सर्वपल्लींचा लौकिक देशात आणि विदेशांत पसरत चालला ऑक्सफर्ड विद्यापीठाने 'हिंदूंचा जीवनविषयक दृष्टिकोन' (Hindu View of Life) या विषयावर त्यांची व्याख्याने आयोजित केली. पुढे ती ग्रंथरूपाने प्रसिद्ध झाली. याच सुमारास कलकत्ता विद्यापीठाने तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून त्यांना पाचारण केले. पंचम जॉर्ज यांच्या नावाने सुरू केलेल्या विद्यासनासाठी त्यांची निवड केली. स्पॉलडिंग नावाच्या एका विद्याप्रेमी आणि दातृत्वसंपन्न पुरुषाने ऑक्सफर्ड विद्यापीठात राधाकृष्णन यांच्यासाठी एक विद्यासन निर्माण केले. या उभय स्थानांना विभूषित करण्यापूर्वी म्हैसूर विद्यापीठाने डॉक्टर राधाकृष्ण यांना तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून गौरवले. सर्वपल्लींचे अखिल जीवन ही मानसन्मानांची वाहती गंगा झाली. या गंगेत अवगाहन करता यावे म्हणून इंग्लंडचे पंतप्रधान सभागृहात किंवा भरल्या वर्गात कडेच्या दाराने प्रवेश करीत. इंग्लंडचे दुसरे एक पंतप्रधान अँथनी ईडन एका सभेत सर्वपल्लींच्या भाषणानंतर बोलावयास उभे राहिले. तेव्हा ते म्हणाले, "डॉ. राधाकृष्णन यांच्या

भाषणानंतर बोलताना नांगरलेल्या शेतातून ठेचाळत, अडखळत, कोसळत चालणाऱ्या एखाद्या बालकाप्रमाणे माझी गत झाली आहे.''

१९३१ मध्ये राधाकृष्णन आंध्र विद्यापीठाचे कुलगुरू झाले. सुमारे सहा वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी विद्यापीठ कळसास नेले. १९३९ मध्ये पंडित मदनमोहन मालवीय यांनी डॉक्टरांना बनारस विद्यापीठाची सूत्रे हाती घेण्याविषयी विनंती केली. सर्वपल्ली त्याही विद्यापीठाचे कुलगुरू झाले. दोन विद्यापीठांचे कुलगुरू म्हणून काम करीत असताना सर्वपल्लींनी आपल्या प्राध्यापकपदाचा त्याग केला नाही. ऑक्सफर्ड विद्यापीठात आठवड्यातील अध्यापनाचे कार्य त्यांनी केले. कलकत्ता विद्यापीठात आठवड्यातील अध्यापनाचे दिवस सांभाळून शनिवार-रविवार या दोन दिवशी बनारस विद्यापीठाचा प्रशासकीय कारभार ते पाहत. हे सगळेच अघटित आणि आश्चर्यजनक होते. कुलगुरूंची योग्यता पाहून, त्यांच्या वृत्तिस्वातंत्र्यास अवसर ठेवून, त्यांच्या अस्मितेचा अपहार न करता त्यांना निर्णय घेण्याचे, धोरण ठरवण्याचे अधिकार देणे हे आजकाल कल्पनेच्या कल्पनेपलीकडले वाटते. कुलगुरू हा गुरुकुलाचा आद्य आचार्य असावयास हवा. ज्ञानाने, तपाने, चारित्र्याने तो सर्वांचा अग्रणी म्हणून शोभावा अशी त्या पदाच्या संदर्भात समाजाची त्या काळी अपेक्षा होती. गुरुदेव रानडे व सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी ती पुरी केली.

भारत स्वतंत्र झाला. भारत सरकारने धर्म आणि संस्कृतीच्या या थोर अभ्यासकास राजदूत म्हणून रशियास धाडले. सरळ अंगकाठी, पाणीदार डोळे, कोट-धोतर-फेटा असा पेहराव, रुबाबदार व्यक्तिमत्त्व, प्रभावी वक्तृत्व, असामान्य भाषाप्रभुत्व - अशा थाटात रशियाची पोलादी भिंत ओलांडून सर्वपल्ली रशियास गेले. आचारविचार आणि रीतिभाती या बाबतींत आपले भारतीयत्व सांभाळून रशियन समाजात वावरणारा हा विलक्षण माणूस पाहून अनेक पत्रकारांनी त्यांच्याविषयी चित्रविचित्र आणि प्रसंगी सचित्र बातम्या दिल्या. रात्री लवकर झोपणारा, पहाटे लवकर उठणारा, भोजनप्रसंगी संयमाने वागणारा, कुठल्याही शासकीय खान-पान समारंभात रेंगाळत न राहता मध्येच सर्वांचा निरोप घेणारा हा भारतीय आचार्य स्टालिनच्या कुतूहलाचा विषय झाला. कोणाला कधीही न भेटणारा स्टालिन दोन तास सर्वपल्लींपुढे बालकाच्या निरागसतेने बसला. त्याच्या जीवनातील ते मंतरलेले क्षण होते. सर्वपल्ली स्टालिनला सहज म्हणाले, ''रक्तपात पाहून ज्याला उपरती प्राप्त झाली आणि ज्याने अहिंसेचा अंगीकार केला असा एक सम्राट माझ्या देशात झाला. तुमच्या बाबतीत असे काही घडणार नाही असे कसे म्हणावे? ''We had an

emperor in India, who after a bloody victory renounced war and became a monk. You have waded your way to Power through force. Who knows that might happen to you also.'' यावर स्टालिन म्हणाला, ''Yes, miracles do happen sometimes. I was in a theological seminary for five years.'' रशियातील आपली कारकीर्द संपवून राधाकृष्णन मायदेशी परत निघाले, तेव्हा स्टालिनने त्यांना मुद्दाम भेटीसाठी बोलावले. जिवाभावाचे बोलणे संपले. हस्तांदोलनासाठी पुढें आलेला हात आपल्या हाती ठेवून पाणावलेल्या डोळ्यांनी तो पोलादी पुरुष डॉ. राधाकृष्णन यांना म्हणाला, ''You are the first person to treat me as a human being and not as a monster. You are leaving us and I am sad... I want you to live long. I have not long to live.'' या शेवटच्या भेटीनंतर सहाच महिन्यांनी स्टालिनने इहलोक सोडला.

महात्मा गांधींना भेटण्यासाठी १९४७ मध्ये राधाकृष्णन गेले. आपले भगवद्गीतेवरचे पुस्तक महात्माजींना समर्पित करण्यापूर्वी त्यांची अनुमती घेणे आवश्यक होते. एक संत आणि एक तत्त्वज्ञ या उभयतांचा सुखद संवाद झाला. या भेटीपूर्वी अनेक वर्षं अगोदर, म्हणजे १९१५ मध्ये मद्रास येथे गांधीजी आणि राधाकृष्णन भेटले होते. त्यावेळची एक मनोरंजक आठवण मध्येच हास्याचा कल्लोळ निर्माण करून गेली. तेव्हा महात्माजी सर्वपल्लींना म्हणाले होते, ''दूध पिऊ नका. गाईच्या अस्थि-मज्जेपासून, रक्त-स्नायूपासून ते तयार होते. गाईचे दूध पिणे म्हणजे गोमांस-भक्षण होय,'' सर्वपल्ली त्यांना म्हणाले होते, ''या न्यायाने आईचे दूध पिणारा नरमांसभक्षक ठरेल.'' महात्माजी तेव्हा मनोभावे म्हणाले, ''याला म्हणतात तर्कशास्त्राचा प्राध्यापक.''

सर्वपल्लींची योग्यता जगातील जाणत्यांनी ओळखली होती. १९५४ मध्ये भारत सरकारने या सुपुत्राला 'भारतरत्न' या पदवीने सन्मानित केले. त्यापूर्वी ऑक्सफर्ड आणि केंब्रिज या उभय विद्यापीठांनी त्यांना सन्माननीय डॉक्टरेट ही पदवी दिली. जगातील अन्य विद्यापीठांनी त्यांचे अनुकरण केले. १९५२ ते ६२ या काळात सर्वपल्ली भारताचे उपराष्ट्रपती होते. १९६२ मध्ये ते राष्ट्रपती झाले. राधाकृष्णन हे भारताचे पहिले उपरांष्ट्रपती होते व दुसरे राष्ट्रपती होते. या बाह्य उपाधीपेक्षा सर्वपल्लींचे अंतर्जीवन अधिक सतेज होते. त्यांच्या उत्तुंग बुद्धिमत्तेचे आणि ग्रंथकर्तृत्वाचे कौतुक सर्व खंडांतून होत होते. आंतरराष्ट्रीय पातळीवरून या तत्त्वज्ञानाचा सन्मान करण्याच्या कल्पनेतून एक ग्रंथ आकारास आला. न्यूयॉर्क येथील 'दि लायब्ररी ऑफ लिव्हिंग फिलॉसफर्स' या नावाच्या एका विख्यात ग्रंथमालेने 'The philosphy of Sarvapalli

Radhakrishnan' या ८८३ पृष्ठांच्या ग्रंथाचे प्रकाशन केले. त्यात जागतिक कीर्तीच्या २३ विद्वानांचे लेख एकत्रित करून 'विसाव्या शतकात डॉ. राधाकृष्णन यांचे योगदान' या विषयाचे सांगोपांग विवेचन घडवून आणले.

अशा या संपन्न जीवनाचे सिंहावलोकन मानमान्यतेच्या मनोऱ्यावरून सर्वपल्ली करीत होते. नेमक्या याच ऐश्वर्याच्या क्षणी त्यांच्या सौभाग्यवती त्यांना सोडून गेल्या. पन्नास वर्षे या तत्त्ववेत्त्याला सावरून नेणारी एक दिव्य शक्ती हरपली. सर्वपल्लींना सारे पूर्वजीवन आठवले. आर्थिक ओढगस्तीच्या काळात आपली सुवर्णपदके विकून मुलाबाळांचा सांभाळ करताना आपल्या पाठीशी उभी राहणारी अम्मा त्यांना आठवली. मानसशास्त्रावरची आपली व्याख्याने फक्त पाचशे रुपयांच्या मोबदल्यात एका प्रकाशकास विकण्याची वेळ आली, तेव्हा आपल्या गरजा कमी करून 'मला फक्त माझ्या कुंकवाची चैन करू द्या' असे म्हणणारी शिवकमू नावाची देवता त्यांच्या डोळ्यांपुढे दिसू लागली. अम्मा गेली! सर्वपल्लींचा देव्हारा भंगला! त्यांचे अमृत नासले ! निराशेचे तिमिर सर्वत्र दाटले. या वेळी त्यांना आधार वाटला तो गीता, ब्रह्मसूत्रे, उपनिषदे या ग्रंथांचा. या प्रस्थानत्रयींनी या तत्त्वज्ञास सावरले.

'परमेश्वर साकार होण्यासाठी मानवी कुडीचा आश्रय घेतो, तो सुखदु:खाची वसने परिधान करतो,' असे सर्वपल्ली म्हणत. त्यांच्या जीवनाकडे पाहिले म्हणजे ते खरे वाटते. 'God comes to self-expression through the regenerated individuals' या सूत्राचा अर्थ त्यांच्या व्यक्तिगत जीवनावरून कळतो.

सर्वपल्लींच्या ठायी असणाऱ्या दिव्यत्वाची साक्ष देणारी एक सत्य घटना अशी– विख्यात गणिती आणि बालबृहस्पती ज्ञानमार्तंड श्रीनिवास रामानुजन गणिताच्या विशेष अभ्यासासाठी विद्यापीठाच्या निमंत्रणावरून केंब्रिजला जाण्यास निघाले होते. प्रस्थान ठेवण्यापूर्वी त्यांची कुलदेवता 'भवानी' एका रात्री त्यांच्या स्वप्नात आली. तिने रामानुजन यांस सांगितले की, देश सोडण्यापूर्वी सरस्वतीपुत्र राधाकृष्णन् यांचे आशीर्वाद घेऊन ये. रामानुजन सर्वपल्लींना त्यांच्या अभ्यासिकेत भेटले. त्यांना चरणस्पर्श करताना हा गणिती द्रवला. इतके असले, तरी सर्वपल्ली स्वत:ला सर्वसामान्य व्यक्ती समजत. आत्मकथनाच्या ओघात एकदा ते एवढेच म्हणाले की, ''स्वत:विषयी सगळेच सांगत बसलो तर तो औचित्यभंग होईल. इतरांप्रमाणेच सुखदु:खाचे आणि भावभावनांचे आरोह-अवरोह मी अनुभवले आहेत. माझ्या व्यक्तिमत्त्वापेक्षा माझ्या ग्रंथांत माझे जीवनसत्त्व गवसेल There is a sense in which our writings, though born out of ourselves, are worth more than what we are, हा

अभिप्राय त्यांच्या जीवनदृष्टीचा निदर्शक आहे.

डॉ. राधाकृष्णन हे धर्मशास्त्राचे समर्थ भाष्यकार होते. धर्म म्हणजे तरी काय? धर्म म्हणजे संप्रदाय नव्हे. आपल्या ठायी असणाऱ्या दिव्यत्वाच्या प्रकटीकरणासाठी आपल्या आचारविचारात माणूस विशिष्ट मार्गाने बदल घडवून आणतो. हा मार्ग म्हणजेच धर्म होय. धर्मसंप्रदाय हे स्थलकालसापेक्ष आणि अनेकविध असू शकतात. पण नित्यकर्म एकच एक आहे. मानवाच्या ठायी इंद्रियातीत असे एक आत्मतत्त्व आहे. तर्क आणि बुद्धी यापेक्षा अंत:प्रज्ञेस (Intuition) त्याचा प्रत्यय येऊ शकतो. अंत:प्रज्ञा म्हणजे आपले अस्तित्व, अंतर्यामी असणारे आत्मतत्त्व आणि सर्वातीत असे सत् तत्त्व यांचे उत्स्फूर्त आकलन. आपल्या अखिल जीवनाला आधारभूत असणारे प्रातिभज्ञान किंवा अंतर्ज्ञान हे माणसाचे जन्मसिद्ध भूषण आहे. हे जग हा एक परमशक्तीचा विकास आणि विलास आहे. विश्वाला व्यापणाऱ्या या तत्त्वाची स्पंदने अंत:प्रज्ञेला प्रतीत होतात. याला प्रातिभज्ञान असे म्हणतात या अनुभवप्रकाराविषयी सर्वपल्ली ग्वाही देतात. "Spiritual experiences is an intergral intuition carrying with it. It's own validity. It reveals to us a being absolute and eternal beyond the categories of thought and expression." जगातील साधुसंतांना, मुनिजनांना, योगाभ्यासकांना, या अनिर्वचनीय अनुभवाची प्राप्ती होते.

या विश्वप्रपंचात प्रथम भौतिक तत्त्व अवतरले. भौतिकाच्या गर्भातून चैतन्य प्रकटले. चैतन्याला पालवी फुटली आणि मनाचा उद्भव घडला. मनातून मूल्यविषयक जाणीव जन्माला आली. या जाणिवेतूनच परमेश्वर नावाचे परम मूल्य प्रकटले. या परममूल्याच्या प्रकाशात चराचराचे ऐक्य आणि अद्वैत शक्य आहे, हे सर्वपल्लींचे तत्त्वचिंतन मनोवेधक आहे.

विज्ञान आणि तंत्रविद्या यांनी जगाला एकच एक देह प्राप्त झाला आहे. अवघे जग एक झाले आहे. पण या देहात एक जीव नाही. तो प्रदान करणे केवळ धर्मालाच शक्य आहे. हिंदू धर्माविषयी सर्वपल्ली म्हणतात, "Hinduism is a movement, not a position; a process, not a result a growing tradition, not a fixed revelation."

नितांत सुंदर अशा इंग्रजी गद्यशैलीतून पौर्वात्य आणि पाश्चिमात्य तत्त्वज्ञानांतील संकल्पनांचे विवरण करणारे सर्वपल्ली कधी कधी स्वत: कवीच होतात. त्यांच्या सुभाषितवजा वाक्यांना काव्याची लय प्राप्त होते.

Greatness of soul is the soul of all greatness... Graduation is

merely a milestone in the journey of life... Each age has its faith and our age is committed to science... अशी कितीतरी उदाहरणे त्यांच्या साहित्यात पानोपानी आढळतात.


इंग्रजीमधून प्रसिद्ध होणारा विख्यात विश्वकोश 'एनसायक्लोपीडिया ब्रिटानिका' या नावाने प्रसिद्ध आहे. त्यांच्या १४ व्या आवृत्तीत भारतीय तत्त्वज्ञानावरचे प्रमाणभूत टिपण सर्वपल्लींच्या साहित्यातून घेतले आहे.

स्वामी विवेकानंदांनंतर आपल्या वक्तृत्वाने विश्व उजळून टाकणारे श्रेष्ठ विचारवंत म्हणून सर्वपल्लींचा जगभर गौरव झाला. इसवी सन १९६२ ते १९६७ सर्वपल्ली राधाकृष्णन हे भारताचे राष्ट्रपती होते. पुढची पाच वर्षे त्यांनीच हे पद मंडित करावे, अशी विनंती त्यांना केली गेली होती. पण मावळतीच्या दिशेने निघालेल्या या तेजोनिधीने नम्रतापूर्वक नकार दिला.

जीवनाच्या सायंकाळी मद्रास येथील 'गिरिजा' नामक निवासस्थानी सर्वपल्ली विसावले. या ज्ञानमहर्षींच्या दर्शनासाठी प्रांतोप्रांतींचे आणि देशोदेशींचे विद्वान मद्रासला येऊ लागले. ज्या महाविद्यालयात ते शिकले, ज्या परिसरात ते फिरले-वावरले, प्राध्यापक म्हणून ज्या नगरात ते प्रथम नावारूपास आले त्या मद्रास शहराने त्यांचे अखेरचे शब्द वेदाज्ञेप्रमाणे शिरोधार्य मानले. दि. १७ एप्रिल १९७५ या दिवशी सर्वपल्लींनी या आपल्या प्रिय नगरातून जगाचा निरोप घेतला.

सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे कोठे पुतळे उभारले जाणार नाहीत. तशी आवश्यकताही नाही. ग्रंथरूपाने ते अजरामर राहतील. 'इंडियन फिलॉसफी', 'आयडियालिस्ट व्ह्यू ऑफ लाइफ', 'हिंदू व्ह्यू ऑफ लाइफ', 'ईस्टर्न रिलिजन्स अँड वेस्टर्न थॉट', 'कल्की ऑर द फ्यूचर ऑफ सिव्हिलायझेशन', 'भगवद्गीता', 'ब्रह्मसूत्रे', 'उपनिषदे', 'धम्मपद' हे त्यांचे ग्रंथ मोठ्या इतमामाने सर्वपल्लींचे स्मरण घडवतील. तत्त्वज्ञान या विषयाच्या अभ्यासकांना ते स्फूर्ती देत राहतील.

✣✣✣



प्राचार्य शिवाजीराव भोसले

माजी कुलगुरु डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ (१९८८-९१)

गेले पाव शतक महाराष्ट्रभर
अनेक विषयांवर अनेक व्याख्याने

पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत सलगपणे
गेली सत्तावीस वर्षे निमंत्रित

काही साहित्य संमेलनातील प्रमुख वक्ते -
खार, विटे, औदुंबर, इंदूर, लॉस एंजिलिस, न्यूयॉर्क इ.

१९८८ सालच्या पुणे विद्यापीठाच्या
पदवीदान समारंभाचे प्रमुख पाहुणे

आजवर अनेक मान्यवर संस्थांकडून
मानपत्रे व पुरस्कार

१५-७-१९२७ ही जन्मतारीख

जन्मगाव कलेढोण, गेली सदतीस वर्षे
फलटणात वास्तव्य

कलेढोण, विटे, सातारा, पुणे येथे शिक्षण

पंचवीस वर्षे महाविद्यालयाचे प्राचार्य,
तीन वर्षे विद्यापीठाचे कुलगुरू,
तीस वर्षे तर्कशास्त्र, तत्त्वज्ञान
या विषयाचे अध्यापन.

पत्ता : श्री अरविंद,
स्वामी विवेकानंद नगर,
फलटण. फोन : २२४४२९

प्रकाशित पुस्तके

















ISBN 978-81-903[illegible]
9 788190 874342